**महाराष्ट्र शासन**

# अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.

**आदिवासी विकास भवन, तळ मजला, गडकरी चौक, जुना आग्रा रोड,**
**नाशिक ४२२ ००२.**

दूरध्वनी क्र. (०२५३) २५७८५६८ / २५७५८१६ E-mail : atc.nsk-mh@nic.in

## जाहिरात

आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-आस्था-२०१६/प्र.क्र.३८७ (भाग-१)/का.१५, दिनांक १ डिसेंबर, २०१८ मधील तदतुदीनुसार विशेष भरती प्रक्रिया राबवून शासकीय आश्रमशाळांमधील ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहाय्यक संवर्गाची १०० टक्के रिक्त पदे भरती करणे बाबत निर्देशीत आहे.

अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक विभाग नाशिक हे त्यांच्या कार्यक्षेत्रातील नाशिक, कळवण, नंदुरबार, तळोदा, धुळे, यावल, राजूर, या प्रकल्पांतर्गत असलेल्या शासकीय आश्रमशाळांतील वर्ग-३ संवर्गाची **ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहाय्यक** यांची खालील रिक्त पदे भरण्याकरिता पात्रता धारक उमेदवारांकडुन विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. त्यानुसार रिक्त पदांचा तपशिल पुढीलप्रमाणे.

सामाजिक व समांतर आरक्षणाची पदसंख्या

| पदाच्या आरक्षणाचा तपशिल | | **ग्रंथपाल** | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकुण पद संख्या | महिला | अपंग | मा.सै. | खेळाडू | अंशकालीन कर्मचारी | भूकंपग्रस्त | प्रकल्प-ग्रस्त | सर्वसाधारण |
| १ | अनुसूचित जाती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | अनुसूचित जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ३ | विमुक्त जाती-अ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | भटक्या जमाती-ब | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ५ | भटक्या जमाती-क | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ६ | भटक्या जमाती-ड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ८ | इतर मागास प्रवर्ग | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ९ | खुला प्रवर्ग | ११ | ३ | ० | २ | १ | १ | ० | १ | ३ |
| १० | एसईबीसी | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | एकुण | **२१** | **६** | **०** | **२** | **१** | **१** | **०** | **१** | **१०** |

| पदाच्या आरक्षणाचा तपशिल | | प्रयोगशाळा सहाय्यक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकुण पद संख्या | महिला | अपंग | मा.सै. | खेळाडु | अंशकालीन कर्मचारी | भुकंपग्रस्त | प्रकल्प-ग्रस्त | सर्वसाधारण |
| १ | अनुसूचित जाती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | अनुसूचित जमाती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | विमुक्त जाती-अ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ४ | भटक्या जमाती-ब | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ५ | भटक्या जमाती-क | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | भटक्या जमाती-ड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | विशेष मागास प्रवर्ग | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ८ | इतर मागास प्रवर्ग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ९ | खुला प्रवर्ग | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| १० | एसईबीसी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | एकूण | **५** | **१** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **0** | **४** |

**टिप:- प्रशासकीय कारणास्तव तसेच बिंदु नामावली तपासणीच्या अधिन जाहिरातीत नमुद केलेल्या आरक्षित पदसंख्येत व समांतर आरक्षणात बदल होऊ शकतो.**

**सदर पद भरती करीता जाहिरात** **https://maharecruitment.mahaonline.gov.in** या संकेतस्थळावर **दिनांक १८.१२.२०१८** रोजी प्रसिध्द करण्यात येणार असून, **दिनांक १८.१२.२०१८ ते ०८.०१.२०१९** या कालावधीत उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करता येतील. ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत, शैक्षणिक अर्हता, सामाजिक व समांतर आरक्षण, परिक्षा शुल्क इ. माहिती **https://maharecruitment.mahaonline.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

अपर आयुक्त, आदिवासी विकास नाशिक या कार्यालयास वरील संकेतस्थळ व वर नमूद कालावधी व्यतिरिक्त इतर पध्दतीने आलेल्या, या जाहिरातीपुर्वी प्राप्त झालेल्या कोणत्याही अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. याची सर्व संबंधितांनी नोद घ्यावी.

**ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहाय्यक या पदाबाबतची माहिती पुढील प्रमाणे:-**

| | | |
|---|---|---|
| पद ज्या वर्गातील व सेवेतील असेल तो वर्ग व ती सेवा: | | वर्ग- ३ |
| नोटीस देऊन नियुक्ती समाप्त करण्यात येते काय, असल्यास, कोणत्या शर्तीवर ? | | होय, नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीचे पालन न झाल्यास नियुक्ती समाप्त करण्यात येईल. |
| (अ) कर्तव्य | | नियमानुसार. |
| (ब) उमेदवारांना जेथे सेवा करावी लागेल त्या कार्यालयाचे/कार्यालयांचे ठिकाण / ठिकाणे | ग्रंथपाल / प्रयोगशाळा सहाय्यक | अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक विभागातील नाशिक / कळवण / तळोदा / धुळे /नंदुरबार / यावल / राजूर या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालये अंतर्गत शासकीय आश्रमशाळा |
| निवडण्यात आलेल्या उमेदवारांना कामावर केव्हा यावे लागेल ? | | नियुक्ती आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाचे आंत |
| परिविक्षाधिन कालावधी | | सर्व पदांवरील नियुक्ती २ वर्षे कालावधीसाठी परिविक्षाधीन म्हणून करण्यात येईल.<br>परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक पुर्ण केल्यानंतरच व नियुक्ती आदेशातील सर्व अटी व शर्तीची पुर्तता झाल्यानंतरच परिविक्षाधीन कालावधी विलोपित करण्यात येईल. |
| पदोन्नतीच्या संधी | | शासन नियमानुसार |
| आवश्यक शैक्षणिक अर्हता | | खालीलप्रमाणे |
| १ | ग्रंथपाल<br>वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे २४००/- | १) १० वी उत्तीर्ण<br>२) लायब्ररी सायन्स डिप्लोमा किंवा ग्रंथालय शास्त्र विषयातील पदवी उत्तीर्ण असावा.<br>३) ग्रंथालय शास्त्र विषयातील पदवीधारक असल्यास प्राधान्य देण्यात येईल. |
| २ | प्रयोगशाळा सहाय्यक<br>वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे १९००/- | १० वी विज्ञान विषयासह उत्तीर्ण असावा. |
| समान अर्हतेचा स्वीकार करता येईल काय अशा अर्हता कोणत्या ? | | नाही. |
| वयोमर्यादा (कोणतीही असल्यास) | | वरील सर्व पदांसाठी जाहिरातीच्या शेवटच्या दिनांकास वय किमान १८ वर्षे पुर्ण व कमाल ३८ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांना ५ वर्षे शिथील.<br>समांतर आरक्षणासाठी वयोमर्यादा<br>१) अपंग- ४५ वर्षे<br>२) माजी सैनिक- ४५ वर्षे,<br>३) खेळाडू- विहित वयोमर्यादेत ५ वर्षे वयात शिथील .<br>४) प्रकल्पग्रस्त- ४५ वर्षे<br>५) अंशकालीन /१९९१ ची जनगणना /१९९४ निवडणूक कर्मचाऱ्यांसाठी-४६ वर्षे |
| राष्ट्रीयत्व | | भारतीय |
| अधिवास | | महाराष्ट्र |

## उमेदवार निवडीची पध्दती

१. शैक्षणिक अर्हते नुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांना आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-आस्था-२०१६/प्र.क्र.३८७ /का.१५, दिनांक १ डिसेंबर,२०१८ मध्ये निर्देश दिल्या प्रमाणे उमेदवारांच्या शैक्षणिक गुणवत्तेतील प्राप्त गुणांच्या आधारे ५० गुणांपर्यंत गुणदान करण्यात येईल.
२. सदर जाहिरातीतील पदांकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांची आदिवासी संस्कृती, स्थानिक बोलीभाषा ज्ञान, कल, बुद्धीमत्ता चाचणी आणि आदिवासी प्रति संवेदनशिलता यावर आधारीत ३५ गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल.
३. ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर शासकीय आदिवासी आश्रमशाळेत पाच वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वर्षे तासिका / रोजंदारी तत्वावर काम केलेल्या वा करीत असलेल्या उमेदवारांना १५ गुणांपैकी खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील.

| अ.क्र. | कालावधी | गुण |
|---|---|---|
| १. | एकुण १० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वर्षे अनुभव | १५ गुण |
| २. | एकुण ८ ते ९ वर्षे अनुभव | १२ गुण |
| ३. | एकुण ६ ते ७ वर्षे अनुभव | ८ गुण |
| ४. | एकुण ५ वर्षे अनुभव | ५ गुण |

**टिप -**

- ५ वर्षापेक्षा कमी अनुभवासाठी गुणदान करण्यात येणार नाही.
- अनुभवाची गणना करतांना ६ किंवा त्यापेक्षा अधिक महिन्यासाठी पुर्णांकात गणना करण्यात येईल.
- शासकीय आश्रमशाळेतील सेवेच्या अनुभवासाठी संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. सदर प्रमाणपत्रामध्ये सेवेचा कालावधी नमूद असणे आवश्यक आहे.
- जाहिरातीमध्ये नमूद ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहाय्यक पदांकरीता आवश्यक असणाऱ्या अर्हतांची पडताळणी केल्या नंतर जे उमेदवार अंतिमतः पात्र ठरतील त्या उमेदवारांमधुन गुणवत्ता व समांतर आरक्षणानुसार आवश्यकतेनुसार नियुक्तीची कार्यवाही करण्यात येईल.

४. वरील प्रमाणे उमेदवार निवडीची कार्यपध्दती मधील अनुक्रमांक १, २ व ३ मध्ये मिळालेल्या गुणांची एकत्रित बेरीज करुन १०० गुणांपैकी जे गुण उमेदवारास प्राप्त झाले असतील, त्या गुणांची गुणवत्ता यादी तयार करुन त्या आधारे उमेदवाराची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.
५. सदर विशेष भरती प्रक्रिये मध्ये उत्तीर्ण होण्याकरीता अनुसूचित जाती-जमातीच्या उमेदवारांना उत्तीर्ण होणेसाठी ४५ टक्के तसेच उर्वरीत इतर सर्व प्रवर्गाच्या उमेदवारांना किमान ५५% गुण मिळविणे आवश्यक राहील.

## --सर्वसाधारण सूचना--

१. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. उमेदवारांस मराठी भाषेचे पर्याप्त ज्ञान असणे आवश्यक आहे.
२. उमेदवाराने जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांचा बारकाईने अभ्यास करावा. उमेदवाराने अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती बरोबर आहे असे गृहित धरुन पडताळणीच्या अधिन राहून ऑनलाईनद्वारे अर्ज स्विकृत करण्यात येतील. उमेदवाराने ज्या पदांसाठी अर्ज केला आहे त्या पदासाठी आवश्यक त्या सर्व अर्हता /आरक्षण उमेदवार धारण करित नसल्याचे कोणत्याही टप्यावर निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.
३. उमेवाराने जाहिरातीतील पदासाठी विहित अर्हता धारण केली म्हणजे त्यास नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्य कोणत्याही टप्प्यावर उमेदवार विहित शैक्षणिक अर्हता धारण करीत नाही असे आढळल्यास गैरवर्तन करतांना आढळल्यास, दबावतंत्राचा वापर करतांना आढळल्यास त्यांची उमेदवारी कोणत्याही टप्यावर रद्द होईल.

४. रिक्त पदाच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची तसेच सामाजिक व समांतर आरक्षणात बदल होण्याची शक्यता असल्याने त्याबाबत अर्जदारास कोणताही दावा करता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, सामाजिक व समांतर आरक्षण याबाबत बदल करणे व रद्द करणे अंशतः बदल करणे तसेच संपुर्ण भरती प्रक्रिया रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक विभाग, नाशिक यांनी राखून ठेवले आहेत.
५. ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहाय्यक संवर्गात उमेदवारांची निवड झाल्यानंतर त्यांना नाशिक विभागातील नाशिक / नंदुरबार / धुळे / अहमदनगर व जळगांव जिल्हयातील कोणत्याही शासकीय आश्रमशाळेच्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येईल.
६. शासकीय आश्रमशाळा निवासी असल्याने उमेदवाराची ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर निवड झाल्यानंतर त्यांना दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी चोवीस तास शासकीय आश्रमशाळेत राहणे बंधनकारक राहील.
७. जाहिरातीत नमुद केलेल्या पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे वय दिनांक ३०.११.२०१८ रोजी गणले जाईल.
८. वयोमर्यादेच्याबाबत दिव्यांग, खेळाडु, प्रकल्पग्रस्त, भुकपंग्रस्त, अंशकालीन उमेदवारांसाठी उच्च वयोमर्यादा शासन नियमानुसार शिथीलक्षम राहिल.
९. जाहिरात व पद भरती संबंधीच्या बाबत https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर सविस्तर सूचना उपलब्ध असून, **दिनांक १८ डिसेंबर, २०१८ ते दिनांक ८ जानेवारी, २०१९ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत** पात्रता धारक उमेदवारांनी वर नमूद संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीनेच अर्ज करावेत.
१०. अपर आयुक्त, आदिवासी विकास नाशिक या कार्यालयास वरील संकेतस्थळ व वर नमूद कालावधी व्यतिरिक्त इतर पध्दतीने आलेल्या, या जाहिरातीपुर्वी प्राप्त झालेल्या कोणत्याही अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. याची सर्व संबंधितांनी नोद घ्यावी.
११. उमेदवारांनी अर्ज करतांना केवळ ऑनलाईन पध्दतीने https://maharecruitment.mahaonline.gov.in. या संकेतस्थळावर जावून अर्ज भरुन त्याची प्रिंट स्वतः जवळ जतन करावी . उमेदवाराची निवड झाल्यास सदरची प्रिंट कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहिल.
१२. लेखी परिक्षेसाठी व कागदपत्र पडताळणीसाठी उमेदवाराला स्वखर्चाने यावे लागेल.
१३. सामाजिक व समांतर आरक्षणानुसार मागासवर्ग प्रवर्गात अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपुर्वी सहा महिन्यांच्या आत जात प्रमाणपत्राची पडताळणी करुन तसे वैधता प्रमाणपत्र अपर आयुक्त कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक राहिल. जात वैधता प्रमाणपत्र तसेच समांतर आरक्षणाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच नियुक्ती दिली जाईल याची नोद घ्यावी.
१४.गुणानुक्रमे सामाजिक व समांतर आरक्षणानुसार अंतिम निवड झालेल्या उमेदवारांनी नियुक्तीपुर्वी त्यांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करुन तसे वैधता प्रमाणपत्र अपर आयुक्त कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक राहिल.
१५. जो पर्यंत उमेदवार जात वैधता प्रमाणपत्र सादर करणार नाही तो पर्यंत त्यांना नियुक्ती आदेश देण्यात येणार नाही तसेच त्या कालावधी पर्यंत त्यांना कोणतेही वेतन / मानधन देण्यात येणार नाही.
१६. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती विमुक्त जाती / भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९.१.२००४ पासून अमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे तत्त्व (क्रिमीलेअर) वि.जा. अ, भ.ज. (ब/क/ड) इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग तसेच महिला व खेळाडु या समांतर अरक्षणातील उमेदवारं ाना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सन २०१७-१८ या कालावधीतील माहे मार्च २०१९ पर्यंत वैध असलेले व अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्यापुर्वीच्या दिनांकाचे (नॉन-क्रिमिलेअर) प्रमाणपत्र धारण केलेले असले पाहिजे.
१७. जर वरीलप्रमाणे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळेस उमेदवार सादर करु शकला नाही तर उमेदवाराने खोटी माहिती सादर केली या कारणास्तव त्याची उमेदवारी तात्काळ रदद करण्यात येईल.
१८. महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बाल कल्याण विभाग क्र. ८२/२००१/मसेआ/२०००/ प्रक्र-४१५/ का-२ दिनांक २५.५.२००१ मधील तरतूदीनुसार राहील. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्तिगट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे सन २०१७-१८ या कालावधीतील माहे मार्च २०१९ पर्यंत वैध असलेले व अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्यापुर्वीच्या दिनांकाचे (नॉन-क्रिमिलेअर) प्रमाणपत्र धारण केलेले असले पाहिजे.
१९. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र-पअंक-१००९/प्रक्र २००/२००९/१६-अ दिनांक २७/१०/२००९ अन्वये सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेतंर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम

केलेल्या व सेवायोजन कार्यालयाकडे त्या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर / पदवीधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय / निमशासकीय सेवेतील गट-क पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी तशी नोंद केलेल्या उमेदवारांनाच अंशकालीन या राखीव प्रवर्गासाठी अर्ज करता येतील.

२०. उमेदवार माजी सैनिक असल्यास सैनिक कल्याण बोर्डामध्ये नांव नोंदणी केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. (सैनिक जर सेवेत असतांना युध्दात किंवा विशेष मोहिमेत दिवंगत झालेत किंवा सेवते असतांना कायमचे वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरवून सेवानिवृत्त केले असतील तर अशा सैनिकांच्या पाल्याचा, पत्नीचा भरतीसाठी शासन निर्णयातील तरतूदीनुसार विचार केला जातो.)

२१. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र-एइएम-१०८०/३५/१६-अ दिनांक २१/०१/१९८० व क्र-न्यायप्र-१००९/प्रक्र २०२/०९/१६-अ दिनांक २७/१०/२००९ अन्वये भुकंपग्रस्त व प्रकल्पग्रस्त उमेदवारांना जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेले उमेदवाराचे नांव नमुद केलेले प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे.

२२. जाहिरातीत दिलेल्या पदांची संख्या कमी अथवा जास्त होऊ शकते. त्यामुळे सामाजिक व समांतर आरक्षणाच्या पदामध्ये बदल होऊ शकतो. त्याबाबत अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचा निर्णय अंतिम असेल.

२३. अर्जात चुकीच्या किंवा अपूर्ण नोंदी असल्यास व योग्य पात्रताधारक नसल्याचे आढळून आल्यास असा अर्ज विचारात घेतला जाणार नाही .

२४.शासन निर्णय आदिवासी विकास विभाग क्र-आस्था-१००२/प्रक्र ४५/का-१५ दिनांक १०/०८/२००५ अन्वये अपंग उमेदवाराच्या नियुक्ती संबंधात संबंधीत पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या आणि सदर शासन निर्णयातील परिशिष्ठ अ मधील निकष लक्षात घेवून त्याप्रमाणे वैद्यकीय मंडळाने अथवा जिल्हा शल्य चिकीत्सक यांनी नियुक्तीसाठी सक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. (किमान ४० टक्के अपंगत्व असल्याबाबत).

२५.शासन निर्णय वित्त विभाग क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा ४ दि.३१/१०/२००५ अन्वये राज्य शासनाच्या सेवेत दिनांक १/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचा-यासाठी नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागू असेल. सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू राहणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमानुसार मानधन / वेतन व भत्ते मिळतील.

२६. विवाहीत महिला उमेदवारांनी अर्ज करतांना त्यांच्या लग्नापुर्वीच्या नावानेच अर्ज करावा.

२७.सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांकः एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२,मंत्रालय,मुंबई-३२, दिनांक १ जुलै,२००५ नुसार दिनांक २८ मार्च,२००६ व तदनंतर तीसरे अपत्य जन्माला आले असल्यास ती अनर्हता ठरुन सेवा समाप्त करण्यात येईल.

२८.शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग व क्रिडा विभाग १) क्र-राक्रीधो-२००२/प्रक्र ६८/क्रीयुसे-२ दिनांक ०१ जुलै २०१६ २) क्र-संकीर्ण-१७१४/प्रक्र ३२५/क्रीयुसे-२ दिनांक २२ एप्रिल २०१५ व ३) क्र-संकीर्ण-१७१७/प्रक्र ३९/क्रीयुसे-२ दिनांक १७ मार्च २०१७ मधील तरतूदीनुसार अत्युच्च गुणवत्ताधारक खेळांडूसाठी आरक्षण असल्याने, राष्ट्रीय व राज्य स्तरावरील ( सदर शासन निर्णयातील परिशिष्ट-अ प्रमाणे विहित प्रमाणपत्र) खेळाचे प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

२९. उमेदवार अपात्र ठरला अथवा गैरहजर राहिला तर ऑनलाईन पध्दतीने भरलेले परिक्षा शुल्क परत केले जाणार नाही.

३०. ग्रंथपाल व प्रयोगशाळा सहाय्यक या पदांच्या पदभरतीसंबंधी काही न्यायालयीन प्रक्रिया झाल्यास, सदर न्यायालयीन प्रक्रिया ही जिल्हा सत्र न्यायालय, नाशिक व मा. उच्च न्यायालय, मुंबई / औरंगाबाद यांच्या कार्यकक्षेतच राहिल याची नोंद घ्यावी.

<u>ग्रंथपाल / प्रयोगशाळा सहाय्यक पदांसाठी परिक्षा शुल्क</u>

खुल्या प्रवर्गात अर्ज करणाऱ्या उमेदवारांसाठी रुपये ८००/-
राखीव प्रवर्गात अर्ज करणाऱ्या उमेदवारांसाठी रुपये ७००/-

सदचे शुल्क हे केवळ ऑनलाईन प्रणालीव्दारे स्विकारले जाईल.
राखीव प्रवर्गातील उमेदवारांना ते खुल्या प्रवर्गातील रिक्त जागांवर अर्ज करतांना त्यांना खुला प्रवर्गासाठी लागु असणारे परिक्षा शुल्क भरावे लागेल.

## ऑनलाईन अर्ज सादर करण्याची पध्दत

सर्व पात्र उमेदवारांनी अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक (Link) उघडावी.

| | |
|---|---|
| १. | भरती प्रक्रियेसंबंधीच्या सर्व अटी-शर्ती असलेल्या माहिती पत्रिकेची प्रिंट काढावी. |
| २. | जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे आपण जर सदर पदास पात्र ठरत असाल तर संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन अर्ज भरावा. |
| ३. | अर्जात नमूद केलेले सर्व रकाने भरल्यानंतर अर्जात फोटो व स्वाक्षरी स्कॅन करुन ऑनलाईन पध्दतीने दिलेल्या ठिकाणावर अपलोड करावी. |
| ४. | अर्जदाराने परिपुर्ण भरलेला अर्जाचे प्रिंट काढून आपल्यासोबत जतन करावी. गुणवत्ता यादीमध्ये उमेदवाराचे नांव असल्यास उमेदवाराला कागदपत्र पडताळणीच्या वेळी ऑनलाईन अर्जाची प्रिंट सादर करणे बंधनकारक आहे. अर्जाची प्रिंट कागदपत्र पडताळणीच्या वेळेस सादर न केल्यास आपली कागदपत्र पडताळणी केली जाणार नाही याची नोंद घ्यावी. |
| ५. | उमेदवाराने अर्ज भरल्यानंतर त्यास अर्जाची सद्यस्थिती कळावी, कागदपत्र पडताळणी सुचनापत्र उपलब्ध व्हावे यासाठी प्रत्येक उमेदवाराने स्वत:चा ई-मेल आय.डी. तयार करुन, मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आय.डी. अर्जात नमूद करणे बंधनकारक आहे. भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत ई-मेल आय.डी. व मोबाईल नंबर सुरु ठेवणे आवश्यक आहे. सदर भरती बाबतची आवश्यक ती माहिती आपणास ई-मेल आय.डी. वर पाठविण्यात येईल. |
| ६. | ऑनलाईन भरलेला अर्ज व प्रत्यक्षात सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास अर्ज रद्द करण्यात येईल. असे उमेदवार यापुढील सर्व निवडी करीता अपात्र ठरविण्यात येईल. |

## समांतर आरक्षणाबाबत महत्वाच्या सुचना

| | | |
|---|---|---|
| १. | खेळाडु उमेदवार | खेळाडु या समांतर आरक्षित पदांसाठी त्या त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, द्वितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त करणारा खेळाडु<br>राज्य अजिंक्यपद स्पर्धा याचा सदर खेळांच्या अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनने स्वत: आयोजित केलेल्या असाव्यात. किमान प्राविण्यपेक्षा उच्च स्तरावरील क्रीडा प्राविण्य मिळविणाऱ्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धांमध्ये भाग घेतलेल्या खेळांडुचा यासाठी विचार करण्यात येणार नाही.<br>अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडुंना शासकीय / निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी आरक्षण ठेवण्याबाबत शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग व क्रिडा विभाग १) क्र-राक्रीधो-२००२/प्रक्र ६८/क्रीयुसे-२ दिनांक ०१ जुलै २०१६ २) क्र-संकीर्ण-१७१४/प्रक्र ३२५/क्रीयुसे-२ दिनांक २२ एप्रिल २०१५ व ३) क्र-संकीर्ण-१७१७/प्रक्र ३९/क्रीयुसे-२ दिनांक १७ मार्च २०१७ मधील तरतूदीनुसार अत्युच्च गुणवत्ताधारक खेळांडूसाठी आरक्षण असल्याने, राष्ट्रीय व राज्य स्तरावरील ( सदर शासन निर्णयातील परिशिष्ट-अ प्रमाणे विहित प्रमाणपत्र) खेळाचे प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल. |
| २. | अंशकालीन उमेदवार | सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र-पअंक-१००९/प्रक्र २००/२००९/१६-अ दिनांक २७/१०/२००९ अन्वये सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेतंर्गत |

| | | |
|---|---|---|
| | | शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व सेवायोजन कार्यालयाकडे त्या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर / पदवीव्युत्तर पदवी तहसिलदार यांचेकडील प्रमाणपत्र असलेले असे अंशकालीन उमेदवार. |
| ३. | माजी सैनिक / माजी सैनिक पाल्य | सैनिक कल्याण बोर्डामध्ये नांव नोंदणी केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. (सैनिक जर सेवेत असतांना युध्दात किंवा विशेष मोहिमेत दिवंगत झालेत किंवा सेवेत असतांना कायमचे वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरवून सेवानिवृत्त केले असतील तर अशा सैनिकांच्या पाल्याचा, पत्नीचा भरतीसाठी शासन निर्णयातील तरतूदीनुसार विचार केला जाईल. |
| ४. | प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त उमेदवार | शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र-एइएम-१०८०/३५/१६-अ दिनांक २१/०१/१९८० व क्र-न्यायप्र-१००९/प्रक्र २०२/०९/१६-अ दिनांक २७/१०/२००९ अन्वये भुकंपग्रस्त व प्रकल्पग्रस्त उमेदवारांना जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेले उमेदवाराचे नांव नमुद केलेले प्रमाणपत्र धारण केले असले पाहिजे |
| ५. | महिला उमेदवार | महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बाल कल्याण विभाग क्र. ८२/२००१/मसेआ/२०००/प्रक्र-४१५/का-२ दिनांक २५.५.२००१ मधील तरतूदीनुसार राहील. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्तिगट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे सन २०१५-१६ या कालावधीतील नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. |
| ६. | अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून १ टक्का समांतर आरक्षण | महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र-अमुजा-२०११/प्रक्र २१२/का-३ दिनांक ०२.०४.२०१८ मधील तरतुदीनुसार अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून १ टक्का समांतर आरक्षण लागु राहिल. |
| ७ | दिव्यांग उमेदवार | एक हात, एक पायाने किंवा एक डोळा दिव्यांग उमेदवार अर्ज करण्यास पात्र त्यापेक्षा जास्त प्रमाण असल्यास असे उमेदवार अपात्र राहतील. |

स्वाक्षरी/-
अपर आयुक्त,
आदिवासी विकास, नाशिक